# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**
**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – १५८३/२०२२/अहमदनगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.किरण शिवाजी गवळी,<br>मु.पो.सुपा C/O आप्पासाहेब व्यापारी संकुल,<br>राहुल होंडा शोरुम, ग्रामपंचायत कार्यालय जवळ,<br>सुपा, ता.पारनेर, जि.अहमदनगर-४१४३०१. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर,<br>ता.पारनेर, जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>सहायक गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, पारनेर,<br>ता.पारनेर, जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक – ०३/०८/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक ११/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती पुरविली, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०३/०८/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी

**सुनावणीसाठी अनुपस्थित-** तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी, तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी

अपिलार्थी यांनी दिनांक २८/०७/२०२१ (दिनांक ०९/०८/२०२१ रोजी पंचायत समिती कडून प्राप्त) रोजीच्या माहिती अर्जान्वये दि.०१ एप्रिल २०१४ ते दि.३१ मार्च २०१५ या कालावधीतील ग्रामपंचायत शहांजापूर यांनी वरील वित्तीय वर्षाचे कालावधीत शासकीय नियमावलीस अधिन राहुन ऑफीस सादीलसाठी खर्च केलेल्या ७०,१५९/- रुपयांचे पूर्ण संचिकेची साक्षांकित प्रत मिळावी. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दिनांक ०७/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये २ पृष्ठांसाठी रुपये ६/- व टपालखर्च रुपये ३०/- असे एकूण रुपये ३६/- माहिती शुल्क भरणेबाबत कळविले. त्यानुसार अपिलार्थी यांनी दिनांक ०१/१०/२०२१ रोजी रुपये ४/- माहिती शुल्क भरल्यानंतर दिनांक २६/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये ९ पृष्ठांची माहिती पुरविली.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०३/१२/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दिनांक १२/०१/२०२२ रोजी निर्णय पारीत करुन जन माहिती अधिकारी यांनी दि.०१/०४/२०१४ ते दि.३१/०३/२०१५ या कालावधीतील ऑफीस सादील साठी रक्कम रुपये ७०,१५९/- झालेल्या खर्चाचे व्हाऊचर्स विनाशुल्क सात दिवसात उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देऊन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी सुचित केले की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती पुरविली. तसेच प्रथम अपील आदेशानुसार माहिती पुरविली नाही.

आज सुनावणीदरम्यान तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मध्ये द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार शिफारस करणे आवश्यक आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २८/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक २६/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि, अपिलार्थी यांनी सदर पत्रान्वये अपूर्ण व दिशाभुल करणारी माहिती पुरविली. तसेच प्रथम अपील आदेशानुसार माहिती पुरविली नाही, असे नमूद केले आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती प्रथम अपील निर्णयानुसार व्यक्तीशः पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २८/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती प्रथम अपील निर्णयानुसार व्यक्तीशः विनामुल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

४) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १५८३/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) मुख्य काय्रकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर, ता.जि.अहमदनगर.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर, ता.पारनेर, जि.अहमदनगर.

---

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र.१५८३/२०२२/अहमदनगर/ओ- 2019 दिनांक - 21/10/2022